# रूप : कवितेचे

संपादक

प्रा. डॉ. शिरीष लांडगे

प्रा. डॉ. भास्कर ढोके    प्रा. डॉ. संदीप सांगळे



सत्त सतोइं कइवच्छलेण कोडीअ मज्झआरम्मि ।
हालेण विरइआइं कुर्ती सालङ्काराणँ गाहाणम्  ।।

– (गाथासप्तशतीमधून साभार)

मराठीचे पूर्वस्वरूप म्हणून आपण प्राकृत भाषेकडे बघतो. गाथासप्तशतीपासून कविता संकलन करण्याची परंपरा असल्याने मराठी भाषेला अभिजातत्व आपोआपच प्राप्त होताना दिसते. प्रस्तुत गाथेत राजा हालाने कोटी गाथांतून सातशे गाथा निवडल्याचा उल्लेख आहे. मराठीच्या या अभिजात परंपरेस 'रूप : कवितेचे' हे संपादन सादरपूर्वक अर्पण...

# अ नु क्र म


- संपादकीय | १३

- देविदास चौधरी

  काही हायकू | ३३

- प्रकाश होळकर

  असे कोणत्या | ३७
  माझे आभाळ | ३८
  भरू दे यंदा | ३९

- कमलाकर आत्माराम देसले

  कोठलाही स्वार्थ नाही | ४०
  तुलाच आळवल्यावर कळले | ४१
  मी शब्दांनी बोलत नाही | ४२

- सौमित्र

  त्याला पाऊस आवडत नाही | ४३
  दिस नकळत जाई | ४४
  बघ माझी आठवण येते का... | ४५

- मंगेश नारायणराव काळे

  लाकूडतोड्याची गोष्ट | ४८
  पाणी | ५०
  आत्महत्या | ५१

❑ प्रज्ञा दया पवार

मॉलने ओसंडून गच्च वाहणाऱ्या । ५२
शो मी युवर जलवाँ । ५४
शांततेला आता आठवत नाही काहीच । ५६

❑ संतोष पद्माकर पवार

हिराबाई जाफरमियाँ । ५८
धुळवड । ६२
डंगळंग मचळंगऽऽ । ६४

❑ संदीप खरे

नसतेस घरी तू जेव्हा । ६५
आयुष्यावर बोलू काही । ६७
नास्तिक... । ६८

❑ नितीन भरत वाघ

ते तुला देव बनवत राहतील । ७०
या आकळलेल्या मुक्तीचं काय करायचं? । ७२
अफगाण : २००१ । ७४

❑ प्रवीण अक्कनवरू

रे टिमकीबहाद्दरा । ७६
आईला कळायच्या नाहीत माझ्या कविता । ७८
मी फेसबुकवर विचारी । ८०

❑ कवी परिचय । ८२

# संपादकीय

कविता हा एक प्रमुख साहित्यप्रकार आहे. या आदिम प्रकारामध्ये कालपरत्वे अनेक स्थित्यंतरे आली. या प्रवाहात कवितेची विविध रूपे, आविष्कार पाहावयाला मिळतात. हे कवितेचे बलस्थान असले तरी, कवितेचे स्वरूप, तिची संकल्पना आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करणेही जिकीरीचे झाले आहे. अशा पार्श्वभूमीवर काही निवडक कवितांच्या आधारे विद्यार्थ्यांची आकलन, आस्वाद आणि विश्लेषणाची क्षमता विकसित करणे; कविता या साहित्यप्रकारातील विविध आविष्कार व भाषा रूपांची ओळख करून देण्याच्या उद्देशातून प्रस्तुत संपादन केले आहे.

**कवितेचे रूप आणि घाट :**

साहित्याची प्रकारनिष्ठ विभागणी शक्य आहे का? असल्यास तसे करणे योग्य आहे का? असे प्रश्न साहित्यप्रकारांविषयक चर्चेत नेहमी चर्चिले जातात. साहित्यप्रकार ही संकल्पना न योजता कलाकृतीची समीक्षा करणे, तिचा आस्वाद घेणे किंवा ऐतिहासिक आढावा घेणे जवळजवळ अशक्य असते. म्हणून साहित्याच्या अभ्यासात साहित्यप्रकार ही संकल्पना महत्त्वाची ठरत असते.

साहित्यप्रकार ही संकल्पना मान्य केली की, वर्गीकरणाच्या संदर्भात काही प्रश्न उभे राहतात. साहित्यप्रकारांची विभागणी करताना काही मूलभूत तत्त्वे विचारात घ्यावी लागतात. प्रत्येक साहित्यप्रकाराची स्वत:ची काही वैशिष्ट्ये आणि तत्त्वे असतात. साहित्यव्यवहारात त्याला करार असे म्हणतात. उदाहरणार्थ, कादंबरी हा कथनाचा (Narration), तर नाटक हा दाखवण्याचा (showing), तर कविता हा भावविण्याचा

(Emoting) करार असतो. कथनामध्ये निवेदक महत्त्वाचा असतो. नाटकात पात्र आणि त्यांच्या क्रिया-प्रतिक्रियांतून कथानक सिद्ध होत असते. तर कवितेत कवीच्या आत्मीय उद्गारातून विशिष्ट भावावस्था व्यक्त होत असते.

कथनात्म, नाट्यात्म आणि भावकाव्यात्म हे साहित्याचे पायाभूत करार मानले जातात. त्यावरून साहित्याचे कविता, नाटक आणि कथा-कादंबरी असे तीन प्रमुख प्रकार मानले जातात. प्रत्येक साहित्यप्रकाराची एक संकेत व्यवस्था असते या संकेतव्यवस्थेत बदलही घडून येऊ शकतात. साहित्याच्या या तीन प्रमुख प्रकारांतील मूलभूत घटकांचा तुलनात्मक विचार करून कवितेच्या व्यवच्छेदक लक्षणांची आणि वाङ्मयीन रूपांची चिकित्सा करता येणे शक्य आहे.

कविता हा एक संमिश्र साहित्यप्रकार आहे. म्हणून या प्रकाराचे विश्लेषण हे अवघड आणि गुंतागुंतीचे होते. कारण, कविता या संज्ञेने ओळखली जाणारी अनेक भाषिक रूपे दाखविता येतात. प्राचीन काळापासून सांस्कृतिक, व्यावहारिक आणि कलात्मक पातळीवर कवितेच्या रूपाचा विचार होत आलेला आहे. मानववंशशास्त्रीय अभ्यासक असे मानतात की, भाषेचा शोध लागण्याच्या आधीच आदिगीताचा जन्म झालेला होता. मानवाच्या उत्क्रांतीच्या एका विशिष्ट टप्प्यावर केवळ 'बोलणे म्हणजे कविता करणे होय आणि सृष्टीतील वस्तुंना नुसते नाव सुचणे, ही सुद्धा दिव्य स्फूर्ती होती.' (Once upon a time the world was fresh, to speak was to be a poet, to name objects an inspiration. - H. W. Garrod)

कवितेचा जन्म हा भाषेबरोबर झाला असे मानले जाते. कविता हा धर्म, संस्कृती, कला आणि शास्त्र अशा सगळ्या मानवी व्यवहारातील घटकांना व्यापून राहिलेला साहित्यप्रकार होय. म्हणून कविता हा आपल्या सांस्कृतिक जीवनाला व्यापून राहिलेला एक आदिम साहित्यप्रकार आहे. त्यामुळे कवितेच्या लौकिक आणि अभिजात अशा दोन्ही परंपरा आढळतात. सर्वसामान्य माणसाच्या जीवनात कविता ही स्तोत्र, सूक्त, भूपाळी, गीत, लघुकाव्य, महाकाव्य, आख्यान, ओवी, उखाणे अशा अनेक रूपांमध्ये

अस्तित्वात होती. अभिव्यक्तीच्या अनेक शक्यता असलेल्या या सगळ्या रूपांना काव्य ही एकच संज्ञा होती. इतकेच काय, एके काळी आपला सगळा जीवनव्यवहार कवितेने व्यापलेला होता.

आधुनिक काळात मानवी जीवनात अनेक स्थित्यंतरे घडून आली. जीवनविषयक जाणिवा बदलल्या. आधुनिकता, यंत्रयुग, विज्ञान, तंत्रज्ञानातून निर्माण झालेल्या राक्षसी किंवा अमानवीय महत्त्वाकांक्षांमुळे मूलभूत मानवी प्रेरणा आणि जगण्याच्या शैलीमध्ये आमूलाग्र बदल झाले. युरोपातील औद्योगिक क्रांती आणि भांडवली व्यवस्थेच्या उदयाने गद्य साहित्याला विशेषत: कादंबरीला महत्त्व प्राप्त झाले असले तरी मानवी जीवनातील काव्याचे महत्त्व कमी झाले नाही. मात्र, या सर्वांचा कवितेच्या रूपाविष्कारावरही परिणाम झाला.

सर्वसाधारणपणे कविता आणि भावनात्मकता, संवेदनशीलता, हळवेपणा असे एक समीकरण प्रचलित असते. म्हणूनच एखाद्या हळव्या मनाच्या माणसाला आपण सहज कवी मनाचा असे म्हणतो. थोडक्यात कवी, काव्य आणि काव्यात्म या संज्ञांना सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन जीवनात विविध अर्थ प्राप्त झाले आहेत.

कविता हा शब्द उच्चारला की, वाचकाच्या मनात कवितेची विविध रूपे आविष्कृत होतात. अनेकदा ही रूपे परस्परांहून भिन्न-भिन्न दिसतात. त्यामुळे कवितेच्या विविध रूपांची चर्चा करताना अनेकदा आपली अवस्था 'लीळाचरित्र' मध्ये वर्णन केलेल्या हत्ती आणि सहा आंधळ्यां-सारखी झालेली असते. त्याचे प्रत्यंतर भारतीय आणि पाश्चात्त्य विद्वानांनी केलेल्या कवितेच्या व्याख्यांतून येते.

कवितेची स्तोत्रे, पदे आदी स्फुट रचनांपासून ते महाकाव्यापर्यंतची अनेक रूपे दिसतात. कवितेची गीत, भावकविता, कथाकाव्य, नाट्यकाव्य, वैचारिक किंवा सामाजिक काव्य अशीही रूपे दिसतात. काळानुरूप कवितेच्या या रूपांमध्ये बदल होत गेला असला तरी गीत (Song) आणि भावकाव्य (Lyric) ही दोन कवितारूपे मात्र कायम राहिलेली दिसतात.

माणसाची ध्वनी, ताल आणि लयीची जाणीव आदिम आहे.

माणसाला सभोवतालच्या सृष्टीच्या विविध अनुभूती व्यक्त करण्यासाठी लय, ताल आणि हावभावांचा उपयोग करता करता त्याला आपल्या कंठातील शब्दांचा शोध लागला. शब्दांच्या लयबद्ध आवर्तनातून गीताचा जन्म झाला. मानवाच्या उत्कट आणि भारलेल्या अवस्थेला शब्दबद्ध करता येणे, ही मानवी आयुष्यातील फार मोठी घटना होती.

शब्द हे कवितेचे मूलद्रव्य असते. आदिमानवाला शब्द सापडल्यावर संवेदना, विचार, भावना, कल्पना, स्मृती व्यक्त होण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, माणसाचा अनुभव, त्याचा मनोव्यापार आणि आविष्कार हा अत्यंत व्यामिश्र, गुंतागुंतीचा होता. असे सगळे व्यामिश्र अनुभव व्यक्त करण्यासाठी माणसाला प्रतिमा, प्रतीके आणि रूपकांची गरज वाटली. यातून गीताचे कवितेत रूपांतर झाले. गीत हा समूहाचा लयबद्ध आविष्कार होता; तर कविता हा आत्माविष्कार होता. त्यामध्ये व्यक्तिगत अनुभूतीची किनार होती. थोडक्यात, गीतातून उत्क्रांत झालेले वाङ्मयीन रूप म्हणजेच भावकविता होय.

कुठलीही कविता किंवा गीत हे भाषेच्या सर्जक शक्तीचा आविष्कार असते. या आविष्काराचे माध्यम 'शब्द' असतात. कवितेत हे शब्द प्रतिमा, रूपक किंवा मिथक होऊन येतात. कवितेतील शब्द हे मुळात भावप्रेरक आणि भावकेंद्री असतात. हे भाव शब्दांतून व्यक्त होताना निरनिराळ्या भावसुसंगत अशा लयींतून सिद्ध होतात. त्याला आपण छंद, जाती, वृत्ते असे म्हणतो. भाव व्यक्त करण्याच्या विविध रूपांतून कवितेचे प्रकार सिद्ध होतात. त्याला आपण अभंग, ओवी आदी नावाने ओळखतो. अर्थात कवितेच्या या विविध रचना-रूपांचा विचार करताना भाषेत शब्द आणि अर्थ हे अविभाज्य घटक असतात हे विसरता येत नाही. कवितेतील शब्दांप्रमाणेच लय, ताल आणि ध्वनीदेखील आशयाचे वाहक असतात.

कवितेच्या रूपाचा विचार करीत असताना, कविता म्हणजे नक्की काय? हेही बघायला हवे. जगभरात अनेक अभ्यासकांनी कवितेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. कागदावर लिहिलेले किंवा छापलेले शब्द दाखवून आपण 'ही कविता आहे' असे म्हणत असतो किंवा

विशिष्ट लयीत म्हटलेल्या शब्दांनाही आपण कविता म्हणू शकतो. पण केवळ अक्षरांचे दृश्यरूप किंवा नादरूप म्हणजे कविता नसते. कारण, असे मानले तर शब्दातील नादरूप किंवा दृश्यरूप महत्त्वाचे ठरतील आणि इतर काव्यघटक गौण ठरतील. अनेकदा शब्दरचनेतील विशिष्ट शब्दांमुळे आपल्या मनातील विशिष्ट प्रकारचा अनुभव हा कविता असते. म्हणून 'वाचकाला येणारा एक विशिष्ट अनुभव म्हणजे कविता' असे आपल्याला म्हणता येईल. (कविता आणि प्रतिमा, पृ.५)

कविता ही कवीची निर्मिती असते. कवितेमधून कवीचे विचार, भावना, जाणिवा किंवा अनुभव अभिव्यक्त होतात. कवीचे हे अनुभव जसेच्या तसे वाचकाला येतीलच, असे नसते. कदाचित वाचकाला कवीच्या अनुभवापेक्षा भिन्न अनुभव येऊ शकतो. हा अनुभव व्यक्ती-स्थल-कालपरत्वे बदलू शकतो. म्हणून, काव्यव्यापारात कवी इतके वाचकालाही महत्त्व असते. कवीशिवाय काव्यनिर्मिती अशक्य असली, तसाच वाचकाशिवायही कवितेला अर्थ प्राप्त होत नाही. एखाद्या लेखनरूपातून जोपर्यंत काव्य असल्याची अनुभूती येत नाही, तोपर्यंत ते लेखन काव्य ठरत नसते. कवितेमधील कवीचा अनुभव आणि वाचकांचे आकलन हे भिन्नही असू शकते. म्हणून वाचकाला कवितेच्या वाचनातून येणाऱ्या विशिष्ट अनुभवाचे स्वरूप विचारात घेऊन कवितेचे स्वरूप निश्चित करता येते.

कविता हे एक भाषारूप असते. हे रूप आपल्या नेहमीच्या बोलण्यापेक्षा वेगळे आणि लयबद्ध असते. आपली नेहमीच्या बोलण्याची भाषा, कवितेची भाषा, कादंबरी-कथा-नाटकाची भाषा आणि शास्त्रीय लेखनाची भाषा अशी भाषेची चार भाषारूपे मानता येतात. यातील कवितेचे भाषारूप हे शास्त्रीय लेखनाच्या भाषारूपाच्या विरुद्ध टोकाला असते. कवितेच्या भाषेत प्रतिमांचे संघटन असते. म्हणूनच कविता ही प्रतिमांची भाषा असते, असे म्हटले जाते. यावरून कवितेसंदर्भात सूत्रे दाखवता येतील :

१. कवितेला स्वतंत्र अस्तित्व असते. कविता ही गतिशील, बदलणारी, वस्तुनिष्ठता असलेली एक वस्तू आहे.

२. कवितेमध्ये आशय आणि अभिव्यक्तीचे अद्वैत असते.
३. कवितेचे अन्य भाषारूपांत किंवा अन्य शब्दांत रूपांतर करता येत नाही. तिचा आस्वाद केवळ तिच्या मूळ संहितेतून घ्यावा लागतो.
४. कविता ही प्रतिमांमधून साधलेली अनेकार्थी, गतिशील, परिवर्तनशील अशी सेंद्रिय संघटना आहे.

**कवितेचे प्रकार :**

सर्वसाधारणपणे कवितेचे भावात्मक, कथात्मक, चिंतनात्मक आणि नाट्यात्मक असे चार प्रकार मानले जातात. भावकविता हा कवितेचा मूलभूत प्रकार मानला जातो. भावकविता ही वाचकाच्या मनावर भाव अवस्थेचा संस्कार करते. इतर सर्व काव्यप्रकारांमध्ये भावकाव्याचे अंश असतात; पण भावकाव्यात मात्र इतरांचे अंश नसतात. आजची भावकविता ही प्राचीन गीतातून उत्क्रांत झाली आहे, असे मानले जाते. प्रारंभी एकच असणारी भावकविता आणि गीत हे काळाच्या ओघात वेगळी झाली. त्यातून पुढे भावकविता आणि गीत असे दोन प्रकार अस्तित्वात आले. आजच्या भावकवितेत शब्दांच्या उच्चारांमुळे निर्माण होणाऱ्या लयबद्धतेला अधिक महत्त्व आहे. कवितेतील भावावस्थेला लय ही समृद्ध व अर्थपूर्ण बनवते. अभंग, ओवी, पद, आरती, धवळे, विराण्या, पाळणा, भूपाळी, लावणी, सुनीत, गझल, हायकू गीत आणि रुबाया आदी कवितेच्या प्रकारांचा समावेश भावकविता या प्रकारात केला जातो.

कवितेचा दुसरा महत्त्वाचा प्रकार म्हणजे चिंतनात्मक कविता. या कवितेत सभोवतालचे वास्तव किंवा त्या वास्तवाच्या निमित्ताने काहीएक चिंतन, काही वैचारिक स्वरूपाची विधाने केलेली असतात. अशा स्वरूपाच्या कवितेला सर्वसाधारणपणे चिंतनात्मक कविता म्हटले जाते. अशा कवितेला वसंत आबाजी डहाके यांनी 'भाष्यकविता' असे म्हटले आहे. मराठीतील ग्रामीण, दलित, महानगरीय, कामगार, स्त्रीवादी अशा विशिष्ट विचारांशी बांधील असणारी आशयविशिष्ट (Committed) कविता चिंतनात्मक प्रकारात येते.

कवितेचा तिसरा प्रकार म्हणजे कथाकविता होय. कथाकवितेत मोजक्या शब्दांमधून गतिमानतेने कृती सांगितली पाहिजे, अशी अपेक्षा हर्बरट रीड या समीक्षकाने व्यक्त केली आहे. कथाकविता ही दीर्घ असते. ही दीर्घता काव्यात्म घटकामुळे नव्हे, तर कथात्म आणि वैचारिक घटकामुळे प्राप्त होत असते. थोडक्यात, एखादा कथात्म आशय काव्यात्म पद्धतीने सांगितला, तर कथाकविता निर्माण होते. नाट्यकविताही एका अर्थाने कथाकविता असते. या कवितेत नाट्याप्रमाणे अकल्पित, अनपेक्षित अशी कृती आणि तिला मिळणारा प्रतिसाद अशा घटनांची मालिका अपेक्षित असते. दोन घटकांतील प्रेरणांचा विरोध, या विरोधी प्रेरणांमधून घडणाऱ्या परस्परविरोधी कृती, म्हणजे नाट्य असे सुधीर रसाळ यांनी म्हटले आहे. (कविता आणि प्रतिमा, पृ. ४२१)

थोडक्यात, कवितेचे रूप हे अनेक वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असते. कवितेची गुणवैशिष्ट्ये आणि रूपवैशिष्ट्ये ही कवितेच्या वर्गीकरणाला किंवा प्रकाराला कारणीभूत ठरतात. कवितेतून व्यक्त होणारा आशय अनेकदा आपला घाट घेऊन येत असतो. त्यामुळेच अभंग, ओवी इत्यादी छंद किंवा परदेशातून आलेले रुबाई, गझल, हायकू किंवा सुनीते हे विशिष्ट प्रकारची रचना धारण करतात.

कवितेच्या प्रकारांविषयी पारंपरिक विचारांपेक्षा अधिक वेगळा विचार करण्याचा प्रयत्न काही अभ्यासकांनी केला आहे. कवितेच्या आशय आणि रूपानुसार तिचे विविध प्रकार अस्तित्वात असू शकतात. आधुनिक काळात कवितेच्या आशय आणि संरचनांचा अधिक बारकाईने विचार सुरू झाल्याने, कवितेचे सूक्ष्म पातळीवर वर्गीकरण करण्याची प्रथा रूढ झाली आहे. तसेच कवितेचे आशयानुसार ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, महानगरी इत्यादी; तर रचनातंत्राच्या अंगाने सुनीत, रुबाई, हायकू, गझल आदी प्रकार सांगितले जातात. थोडक्यात, कवितेचा आशय हा नेहमी आपले रूप घेऊन अवतरतो किंवा कवी विशिष्ट आशय व्यक्त करण्यासाठी विशिष्ट रचनाप्रकार निवडत असतो.

## ‘रूप : कवितेचे’ मधील कविता :

आपण प्रस्तुत संपादनात कवितेच्या काही निवडक आशयरूपांचा आणि रचनाप्रकारांतून कवितेचे रूप शोधणार आहोत. यातील पहिला प्रकार हा गीतांचा आहे.

मराठीत सौमित्र आणि संदीप खरे यांनी मौलिक कविता, गीतरचना केलेली आहे. सौमित्र यांची कविता ही तरल प्रेमभावना प्रकट करणारी आहे. मराठी कविता ही आवाजी आणि प्रचारकी होत असतानाच्या काळात सौमित्र यांनी आपल्या कवितेतून तरलता आणि भावनात्मकता जपली आहे. मराठी कवितेत इंदिरा संत, ग्रेस, ना. धों. महानोर अशा अनेक कवींनी आपल्या कवितेतून पावसाच्या प्रतिमा योजल्या आहेत. त्या परंपरेमध्ये पावसाच्या प्रतिमेचा एक वेगळा आविष्कार सौमित्र यांच्या कवितेत पाहावयास मिळतो. सौमित्र हे पावसाच्या प्रतिमेतून प्रेमी युगुलांचा शृंगार उभा करतात. त्यांच्या ‘त्याला पाऊस आवडत नाही’ ही कविता प्रियकर आणि प्रेयसीच्या मनातील द्वंदात्मक रूप आविष्कृत करते.

**पाऊस आवडत नसला तरी ती त्याला आवडते**
**पावसांसकट आवडावी ती म्हणून तीही झगडते**
**रुसून मग ती निघून जाते भिजत राहते पावसात**
**त्याचं तिचं भांडण असं ओल्याचिंब दिवसात**

किंवा प्रियकराच्या प्रेमाचा साक्षी असलेला पाऊस हा प्रेयसीच्या नेणीवेत कसा रुजलेला असतो, याचा अनुभव ‘**बघ माझी आठवण येते का....**’ या कवितेतून येतो. या कवितेत प्रियकर आणि प्रेयसीच्या विरहाचे, त्यांच्या अधुऱ्या प्रेमाचे अत्यंत हळवे, आर्त आणि चिंब वर्णन येते. पावसात प्रियेची आठवण किती रूपात प्रकट होते, ते

**मुसळधार पाऊस...**
**खिडकीत उभी राहून पाहा...**
**बघ माझी आठवण येते का...**

या कवितेत येते. प्रियकराच्या हुरहूर वाढविणाऱ्या, कातर प्रश्नांच्या

मालिकेतून प्रेयसीच्या मनातील साचून राहिलेला पाऊस चित्रमय रूपात प्रकट होतो. आत्यंतिक चित्रमयता हे या कवितेचे बलस्थान आहे. 'दिस नकळत जाई' ही गेय कवितादेखील प्रियकर आणि प्रेयसीच्या विरहाचे, त्यांच्या प्रेमाचे, प्रेमातील स्वप्नमयतेचे, हुरहूर लावणाऱ्या दिवसांतील मंतरलेल्या क्षणांचे दर्शन घडवते. प्रतिमा आणि प्रतीकांतून प्रत्ययकारी चित्र उभे करणे, हे सौमित्र यांच्या कवितेचे विशेष आहे.

संदीप खरे यांच्या 'नसतेस घरी तू जेव्हा' हे लोकप्रिय गीत प्रथमदर्शनी एखाद्या प्रियकराची प्रेयसीच्या विरहातील आर्त हाक वाटते. पण प्रत्यक्षात ही एक मुलाने आपल्या आईची केलेली व्याकूळ आठवण आहे. आईशिवाय आपल्या अस्तित्वाला काहीच अर्थ नाही. तिच्यावाचून घर, जगणे हे सगळे विरलेल्या वस्त्रासारखे आहे. आई आणि मुलाच्या निस्सीम, निरागस आणि आदिम प्रेमाचे बंध

**तव मिठीत विरघळणाऱ्या**
**मज स्मरती लाघववेळा**

असे तरलपणे उलगडतात. मातृप्रेमाचा हा हळवा सूर 'आयुष्यावर बोलू काही'मध्ये तितक्याच हळुवारपणाने आयुष्याचे, जगण्याचे मर्म सहजपणे उलगडून दाखवितो. जीवनातील भूत-भविष्याच्या हळव्या, कातर चिंतांमध्ये सुंदर वर्तमान हरवून जातो. म्हणून जीवनामध्ये सुख, दु:खाला धीरोदात्तपणे सामोरे जाणे हे अधिक श्रेयस्कर असते. त्यामुळे

**उद्या उद्याची किती काळजी बघ रांगेतून**
**परवा आहे उद्याच नंतर बोलू काही**

ही वास्तविकता स्वीकारत जगणे महत्त्वाचे असते. जगण्याचे असे हे तत्त्वज्ञान ही कविता अत्यंत हळवेपणाने प्रकट करते आणि गेयतेने कवितेत प्रकट होते. 'नास्तिक' ही कविता माणूस आणि ईश्वर यांच्यातील आदिम नात्यांचा शोध घेते. ईश्वरी अस्तित्वाच्या शक्याशक्यतेतून आस्तिक - नास्तिक वाद उभा राहतो. अशावेळी

**देऊळ बंद झाल्यावर एक मस्त आळस देऊन**
**बाहेर ताटकळलेल्या नास्तिकाशी गप्पा मारता मारता**

**देव म्हणतो दर्शन देत जा अधून मधून...**
**तुमचा नसेल विश्वास आमच्यावर**
**पण आमचा तर आहे ना**

जीवनामध्ये आस्तिक-नास्तिक विरोधापेक्षा माणूस म्हणून साहचर्य स्वीकारत जगणे महत्त्वाचे आहे. तरल, संवेदनशील अनुभव आणि गीतानुकूल शब्दकळा ही संदीप खरे यांच्या गीतांची वैशिष्ट्ये आहेत.

कवितेचा दुसरा प्रकार म्हणजे विचारांशी बांधील असणारी आशयविशिष्ट (Committed) कविता चिंतनात्मक कविता होय. या प्रकारात प्रकाश होळकर यांची कविता ही कोरडवाहू शेती आणि शेतकऱ्याचे दु:खं मांडणारी आहे. त्यांच्या कवितेतून शेती-माती आणि शेतकऱ्यांच्या भावविश्वातील अनेक नावीन्यपूर्ण प्रतिमा अवतरतात.

**डोळां उन्हाचे कुसळ**
**आणि झळाया रानाला**
**कोंब फुटण्याच्या आधी**
**माती जळते दाण्याला**

असे वर्षानुवर्षे कोरडी नक्षत्रे शुष्क डोळ्यांनी पाहणारा शेतकरी कवी

**भरू दे यंदा मृगाचं आभाळ**
**नावाचा तुझ्या यळकोट करील**
**वाहू दे यंदा वहळनाले**
**नावाचा तुझ्या यळकोट करील**

असे आधुनिक पसायदान मागतो. होळकरांची कविता ही लोकसाहित्य, लोकपरंपरा आणि लोकलयीच्या जवळ जाणारी आहे. याचे प्रभावी रूप **'माझे आभाळ तुला घे तुझे आभाळ तुला...'** मधून दिसते. प्रेमभावनेतील समर्पणाचा हा अलवार आविष्कार लोकगीताची लय घेऊन प्रकट होतो.

प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेचा वंचितांचे जीवनानुभव, समाजातील विरोधाभास आणि जागतिकीकरणामुळे बदलते सामाजिक

वास्तव स्थायीभाव आहे. बाजारकेंद्री समाजव्यवहारात मानवी भाव-भावनांपेक्षा आर्थिक हितसंबंध महत्त्वाचे ठरत असून मानवी संबंधात कोरडेपणा आल्याची खंत

कविता निरर्थक ठरवल्या जाणाऱ्या
इंडिया शायनिंगच्या चकचकीत पडद्यावर
कवयित्री विचारते स्वत:ला
आणि मुकाट
मुकाट होते
मॉलने ओसंडून गच्च वाहणाऱ्या
वर्तमानात हिंडताना

जागतिकीकरणाच्या रेट्यात आपण आपले स्वत्व आणि आणखी बरेच काही गमावल्याची खंतही त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. आपल्या सगळ्या प्रेरणा बाजारकेंद्री झाल्याने आपण भांडवलशाही व्यवस्थेचे गुलाम झालेलो आहोत. म्हणून 'शो मी युवर जलवाँ'मधून

यानं पुसलेत अधिनायक
पुसला रायरंद
पुसला सोंगाड्या
पुसला नाच्या
पुसला नाचवणारा

अशा बाजारकेंद्री व्यवस्थेने गिळलेल्या अनेक गोष्टी ही कविता आपल्यासमोर मांडते. मॉडर्न होण्याच्या नादात आपण काय काय गमावून बसलो आहोत, हे सांगताना 'शांततेला आता आठवत नाही काहीच' या कवितेत

शांततेला आता आठवत नाही
कसं नष्ट होत गेलं
अवघ्या अस्तित्वाला
व्यापून असणारं
अमर्याद असीम बुद्धपण

असा प्रश्न उपस्थित करणारी ही कविता अखिल मानवतेच्या भविष्याची चिंता व्यक्त करते.

मंगेश नारायणराव काळे यांची कविता विंदा करंदीकर, अरुण कोल्हटकर, दि. पु. चित्रे या परंपरेतील आहे. ते आपल्या कवितेतून दंतकथा, पुराणकथा, मिथके यातून इतिहासाला नवे परिमाण देतात. 'पुन्हा पुन्हा सांगितली जाऊ शकते' मधून,

**खरं म्हणजे जो घरी परततो तो लाकूडतोड्या नसतोच मुळी**
**आकार असतो नुस्ता लाकूडतोड्याचा**
**जो विहिरीत न पडताही सापडलेला असतो त्यालाच**

अशी आपल्या नेणीवेतील लाकूडतोड्याची गोष्ट नवा अन्वयार्थ प्रकट करीत आपल्या समकाळातील वास्तवाकडे निर्देश करते. त्यांची 'पाणी' ही कविता जगण्यातील अवस्थांतर दर्शविते. एकेकाळी पाणी हे जीवन मानले जायचे, ते आता विक्रीयोग्य वस्तू झाले आहे. पाणी आता सामान्य माणसाच्या जीवनातून हद्दपार होत आहे. म्हणून,

**उडून गेलाय पाणी हा शब्द गावातून**
**नदीतून विहिरीतून थेट माठातून सुद्धा**
**गहाळ झालंय आद्याक्षर पाण्याचं**
**नि लिहिताच येत नाहीये**
**कुणालाच या सेंचुरीत**

येथे पाणी हे प्रतीक सामान्य माणसाचे जगणे असह्य होत असल्याचे सूचन करते. उदारीकरण, जागतिकीकरणाचा भीषण चेहरा 'आत्महत्या' या कवितेतून

**म्हणजे प्रतिशब्दच शोधून काढलाय**
**या निरक्षरांनीच आत्महत्या या शब्दाला**
**जो लिहिता किंवा वाचण्याचीही नसते गरज कधीच**

**आत्महत्या हा शब्द**
**आता शेतकरी असंही लिहिता येतो**

असा ओरबाडून काढते. शेतकऱ्यांच्या, शेतीच्या दारुण अवस्थेचे

हे वर्णन जागतिक व्यापार व्यवस्थेचा पहिला दृश्य परिणाम असल्याचे सूचन करते. मंगेश नारायणराव काळे यांच्या कवितेतून महानगरीय जीवनाचे सूक्ष्म ताणेबाणे प्रत्ययाला येतात.

कवितेचे आणखी एक रूप संतोष पद्माकर पवार यांच्या कवितेतून पाहावयास मिळते. 'हिराबाई जाफरमियाँ'तील हिराबाई

**संतोसभाऊ,**
**मला मेल्यावर लोक जाळतील का**
**पुरतील रे?**
**माझं नाव नोंदून बघना**
**तुझ्या गावचा कबरस्तानात**
**नि सांग असासं झाल्तं म्हणून...**

असा प्रश्न विचारते. तिचा हा प्रश्न, माणसांचे जगणे आणि नीतीनियमातील विसंगतीतून जीवनाचे एक रूप दाखवतो. जीवनाचे हे रूप अस्वस्थ करणारे आहे. ही अस्वस्थता 'धुळवड'मधून अधिक तीव्र होते.

**डोईचा गुंडा धरून पोर गुमान कशी चालली होती**
**लांबून आली रंगेल टोळी रंगाची फेक करत होती**
**मारली कोणी पिचकारी ती जन्माला डाग पाडून गेली**
**धुळवडीचा दिवस होता रंगानं पोर माखून गेली**

अशा कथनातून परंपरा आणि वास्तव यातील विसंगतीतून जीवनाचे आणखी एक विदारक चित्र साकार करते. 'डंगळंग मचळंगऽऽ' मधून

**पयला सलाम घेता देताच**
**भजनाआधी गाडलं गेलेलं**
**भूत आपोआपच होतं जागृत**
**नित्याच्या धंद्याला होते सुरुवात**
**दिवसा उजेडी सुरू होतो मनात हैदोस**
**डंगळंग मचळंगऽऽ डंगळंग मचळंगऽऽ**

असा माणसांच्या विचार आणि वर्तन व्यवहारातील विरोधाभास नेमकेपणाने सांगते. संतोष पद्माकर पवार हे आपल्या कवितेतून अत्यंत संवेदनशीलतेने आयुष्यचित्रे, स्वभावचित्रे रेखाटतात. अशावेळी ही कविता गद्याकडे झुकताना दिसत असली तरी, बोली भाषेतील शब्दांच्या अर्थपूर्ण योजनेमुळे मुक्तछंदातील या कवितेला आंतरिक लय प्राप्त होते. ही कविता माणसांच्या वृत्ती प्रवृत्तींवर, त्यांच्या वर्तन व्यवहारावर प्रहार करणारी आहे. समकालाची संवेदनशील अनुभूती हे संतोष पद्माकर पवार यांच्या कवितेचे बलस्थान आहे.

१९६० च्या दशकात वेदना आणि विद्रोह मांडणारे दलित साहित्य हे १९९० नंतर बदलू लागले. विशेषत: २०००नंतरच्या काळात दलित साहित्यात नव्या जाणिवा व्यक्त होऊ लागल्या. नव्या पिढीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि तथागत गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान नव्या परिप्रेक्षात मांडण्याची आवश्यकता भासू लागली. अशा पिढीचे नितीन भरत वाघ हे एक प्रातिनिधिक कवी होय. ते जगाकडे तथागत गौतम बुद्धाच्या सम्यक भावाने, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैश्विक दृष्टीने पाहतात. मानवीमूल्ये आणि शांतता हेच मानवी कल्याणाचे एकमेव साधन आहे. कुठल्याही प्रकारच्या हिंसेचा, हिंस्र वृत्तीचा निषेध हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या त्रिसूत्रीचा अन्वयार्थ समकालीन संदर्भात योजताना,

**धरताही येत नाही सोडताही**
**मानगुटीवर बसलेली**
**फासासारखी**
**जगू देत नाही मरूही**
**श्वासात अडकलेल्या श्वासासारखी**
**रोखते सोडते**
**मुक्तीच्या कोलाहलात समष्टीचा छळ**
**धड इकडे ना धड तिकडे**
**येऊ देणारी ना जाऊ देणारी**

माया व्यामोहाच्या झुल्यावर
त्रिशंखू चलिंदर
अस्तित्व वास्तवाचे क्षणीक
चांदणचकवा भरदिवसा
या आकाळलेल्या मुक्तीचं काय करायचं

अशी चळवळीतील विचारी कार्यकर्त्यांची संभ्रमावस्था सूचित करीत एक वैचारिक दिशा देण्याचा, मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करतात. 'अफगाण' या कवितेतून

बामियानचा उद्ध्वस्त बुद्ध बघतो
हसऱ्या डोळ्यांनी
त्याचीच प्रतिमा असंख्य डोळ्यांत
विझत जात असताना गोळ्यांत

अफगाणमधील बुद्धप्रतिमेला उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न हे मानवतेवरील संकट आहे. या हिंस्त्रतेचे दर्शन घडवीत ही कविता गौतम बुद्धांचे विचार जगाला मुक्तीकडे नेऊ शकतात, याचे सूचन करते. महापुरुषांचे दैवतीकरण, अस्मितेत रूपांतरण हे त्यांच्या मूळ शिकवणीला तिलांजली देणे असते. म्हणून

ते तुला देव बनवत राहतील
मी तुझ्यातला माणूस विसरू देणार नाही
तो ठेवेल शिल्लक
खरवडून शेंदूर
तुझ्यावरचा
तुला बसवला मखरात सजवून धजवून तरी
पुस्तकातला तू मांडत राहीन जिवाच्या आकांताने

अशी आपली व्यवस्था विरोध नोंदवितात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, ज्ञान हेच त्यांचे खरे रूप आहे. त्यांना देवत्व देऊन त्यांच्यातील माणूसपण नष्ट होऊ देऊ नये, असे कवीला वाटते. नितीन भरत वाघ यांची कविता आंबेडकरी परंपरेला एक नवी विधायक

आणि वैचारिक दिशा देणारी कविता आहे. प्रवीण अक्कनवरू हे अगदी अलीकडचे, तरुण तंत्रस्नेही पिढीची कविता लिहिणारे कवी आहेत. आपले सगळे आयुष्य तंत्रज्ञान, विविध समाजमाध्यमे आणि व्यापारकेंद्री व्यवस्थेने व्यापलेले आहे.

प्रवीण अक्कनवरू हे अगदी अलीकडचे, तरुण तंत्रस्नेही पिढीची कविता लिहिणारे कवी आहेत. आपले सगळे आयुष्य तंत्रज्ञान, विविध समाजमाध्यमे आणि व्यापारकेंद्री व्यवस्थेने व्यापलेले आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर बदलत जाणारे राजकारण, समाजकारण, भांडवली व्यवस्था आणि त्यांचे बाजारीकरण या सगळ्या थोतांडी वाटणाऱ्या जगाकडे पाहण्याचा एक स्वतंत्र मानवी दृष्टिकोन कवी व्यक्त करतो. सत्ताकरण आणि समाजकारण करणाऱ्या एका व्यवस्थेला तो काही प्रश्न विचारू पाहतो. संस्कृतीचा वृथा अभिमान बाळगणाऱ्या समाजाला तो विचारतो की,

**गवसलाय का तुला दहावा रस, अकरावी दिशा**
**किंवा आठवा स्वर तरी आजतागायत**

असा प्रश्न उपस्थित करून स्थितीवादी समाजाचा नाकर्तेपणा दाखवतात. वरवर आपण भगवान बुद्ध, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांचे नाव घेत असतो, वेळ आली की, त्यांचे विचारही उद्‌धृत; करतो पण प्रत्यक्षात त्यांच्याप्रमाणे आचरण मात्र करत नाही, आपला विचार आणि आचार यात तफावत असते, या ढोंगीपणावर बोट ठेवताना म्हणतात-

**तुला थेरोटीकली अवगत आहे बुद्धाची करुणा**
**मुखोद्गत आहे ज्ञाना-तुकयांची प्रतिभा**
**तू कोळून प्यायले आहेत सगळे वाद- अन् -शास्त्रही**
**अन् शोषली आहेत तत्त्व-बित्त्व मूर्तिमंत बांडगूळाच्या निष्ठेने**

एखादे बांडगूळ जसे परजिवी असते, ते दुसऱ्याचा रस शोषून जगते तसे हे केवळ दुसऱ्यांच्या विचारांवर जगणार आहेत असे म्हणत तो मूलभूत प्रश्न विचारतो की,

हे संस्कृतीवाद्या तुझं असे काय आहे?
तुझं असं काय आहे?

मी फेसबुकवर विचारी या कवितेतूनही आभासी जगात किंवा अवकाशात अडकलेल्या पिढीचे वर्णन आलेले आहे. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम समाजमाध्यमांच्या प्रभावात अडकलेल्या प्रचारकी, स्वयंप्रेमातील, विवेकशून्य वर्तनाचे चित्रण येते. अवघे जग आभासी दुनियेच्या, बाजाराच्या हातचे बाहुले झाले आहे. या जगातील माणसे म्हणजे ग्राहक, ते विक्रीयोग्य वस्तु आहेत. यापेक्षा माणसाच्या जगण्याला अधिक महत्त्व नाही. हे सूचित करताना कवी म्हणतात,

अलबत, मी आजन्म ग्राहक आहे इथला
पण मी आहे उत्पादक, होलसेलर अन रिटेलरही
धारणांच्या झुलत्या काट्यानुसार
अल्गोरिधमच्या अतिमानवी रेटयानुसार

जागतिकीकरण आणि बाजारीकरणाच्या रेट्यात माणसांची झालेली अवस्था आणि त्यात निर्माण झालेली एकरेषीय संस्कृती यावर अत्यंत बोचरे पण वास्तव भाष्य कवी करतात. एकूणच नव्या पिढीची कविता कोणत्या वळणावर आहे, यांचे प्रातिनिधिक उदाहरण म्हणजे प्रवीण अक्कनवरू यांची कविता आहे.

कवितेचे आणखी एक रूप हायकूतून दिसते. हायकू हा जपानी काव्यप्रकार शिरीष पै यांनी मराठीत आणला. 'तांका' या जपानी काव्यप्रकारातून हायकू हा काव्यप्रकार उदयास आला. यामध्ये तीन काव्यपंक्ती आणि साधारण सतरा अक्षरे (शब्दावयव) असतात. अल्पाक्षरी आणि बंदिस्त रूप असलेला हा काव्यप्रकार आहे. यात पहिल्या ओळीत पाच, दुसऱ्या ओळीत सात आणि तिसऱ्या ओळीत पुन्हा पाच अक्षरे असतात. हायकू या रचनाप्रकारामध्ये प्रमुख विषय ऋतुचक्र किंवा निसर्ग असतो. तीन ओळींच्या एका रचनेत एक तरी निसर्ग प्रतिमा आणि प्रतिमांचा प्रतिकात्मक उपयोग असावा लागतो. तरलता, हळुवारपणा आणि चित्रमयता हा या रचनेचा विशेष असतो. झेन

तत्त्वज्ञानाचा प्रभाव असलेला हा काव्यप्रकार जपानमध्ये 'मात्सुयो बाशो' यांनी लोकप्रिय केला. चिनी आणि कोरियन भाषेतही हा काव्यप्रकार लोकप्रिय आहे. प्रारंभी या प्रकारात निसर्ग आणि ऋतुवर्णन असायची. हा काव्यप्रकार जगभर लोकप्रिय झाल्यानंतर त्यामधून इतरही विषय त्यातून मांडले जाऊ लागले. मराठीमध्ये काही मोजक्या कवींनी या प्रकारात रचना केलेली दिसते. त्यामध्ये देविदास चौधरी हे एक महत्त्वाचे कवी आहेत. देविदास चौधरी यांनी निसर्गवर्णनाबरोबर प्रेमभावना, सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या हायकू रचना लिहिल्या आहेत.

कॉफी हाऊस
प्रत्येक टेबलाशी
नवा पाऊस

किंवा

पक्ष्यांचे खेळ
झाडाच्या पानोपानी
बुडाशी ते दोन्ही

अशा सतरा अक्षरे आणि तीन ओळींतून एक परिपूर्ण चित्रमय कथा सांगणे म्हणजे हायकू होय. अशा या तरल, भावनाप्रधान काव्यप्रकारामध्ये रचनेचे तंत्र अत्यंत महत्त्वाचे असते.

हायकूप्रमाणे गझल हा देखील एक तंत्रप्रधान काव्यप्रकार आहे; त्यामुळे गझलमध्ये रचनाकौशल्य महत्त्वाचे ठरते. फारसी आणि भारतीय भाषांच्या संकरातून उर्दू किंवा पूर्वी रेख्ता म्हटले जायचे, ती भाषा निर्माण झाली. अनेक शतकांच्या फारसी, उर्दू भाषांच्या साहचर्यातून गझल उर्दू भाषेत लोकप्रिय झाली. उर्दूच्या संपर्कातून गझल हा प्रकार मराठी भाषेतही रुजला. भावनांची आत्यंतिक उत्कट, तरल अभिव्यक्ती हे गझलेचे वैशिष्ट्य होय. प्रेम, प्रेमातील विरह, दुःख, वेदना यांचा भावोत्कट आविष्कार गझलेतून पाहावयास मिळतो. तंत्रावर प्रभुत्व असल्या-शिवाय प्रभावी गझल लिहिता येत नाही. एकाच वृत्तातील, एकाच यमकाला काफिया म्हणतात आणि अंत्य यमकाला रदीफ असे

म्हणतात. अशा रचनेच्या प्रत्येकी दोन-दोन ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक शेरांची रचना म्हणजे गझल होय. गझलेतील दोन ओळींच्या स्वतंत्र रचनेला शेर म्हणतात. प्रत्येक शेर हा अर्थदृष्ट्या वेगळा असतो. कधी हे शेर एकमेकांना पूरक तर कधी भिन्न असतात. म्हणून गझलेतील शेरांचा क्रम बदलला तरी फरक पडत नाही. थोडक्यात, गझलेतील प्रत्येक शेर हा स्वतंत्र अभिव्यक्ती असतो. गझल समजून घेण्यासाठी शेरच्या अर्थाबरोबरच गझलेचा आकृतिबंध समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. मराठी भाषेत गझल लोकप्रिय करण्याचे श्रेय निर्विवादपणे सुरेश भट यांना दिले जाते. कमलाकर आत्माराम देसले यांनी सुरेश भटांच्या परंपरेतील गझल त्यांनी लिहिली आहे. त्यांच्या गझलांतून वारकरी संप्रदायाच्या प्रभावातून आध्यात्मिक वारसा जाणवतो. त्यांच्या कवितेची सर्वांभूती समभाव, प्रेम ही शाश्वत मानवी मूल्ये आहेत. गेयता, लयबद्धता हा अलीकडे दुर्मिळ होत असलेला काव्यगुण त्यांच्या कवितेत आढळतो. आपल्या आयुष्यात एखाद्या गोष्टीचा अभाव आणि तृष्णा पूर्ण झाल्यावर येणाऱ्या अवस्थेचे वर्णन

उजेड असतो अंधारातच
उजेड मालवल्यावर कळले

अशा ओळीतून करतात. 'मी शब्दांनी बोलत नाही' या गजलेतून प्रेम या शाश्वत मूल्यांचे वर्णन केले आहे. प्रेम हे त्यागावर अवलंबून असते, समर्पण भाव प्रेमात फार महत्त्वाचा असतो

बदलणार जे नाही कधीही
त्या सत्यांशी भांडत नाही

किंवा

कोठलाही स्वार्थ नाही
काय हा परमार्थ नाही?

प्रेमातील स्वार्थ, त्याग, समर्पण भाव आत्मपरीक्षण हे उच्च आध्यात्मिक भाव असल्याचे सूचन त्यांच्या कवितांमधून होते. गझल

या तंत्रप्रधान काव्यप्रकारासाठी हवे असणारे तंत्रावरील प्रभुत्व आणि गझलसाठी आवश्यक तरलता याचा अप्रतिम समन्वय कमलाकर आत्माराम देसले यांच्या कवितेत आढळतो

थोडक्यात, अशा काही निवडक कवी आणि त्यांच्या कवितांच्या आशयरूपांचा विविध रचनाप्रकारांतून विचार केला आहे. यातून समकालीन कवितेचे एक रूप समोर येते. या रूपाला काहीएक मर्यादा देखील असू शकतील. समकालीन कवींच्या कवितांमधून आशयाची बहुविधता दिसून येते. प्रस्तुत संपादनातील निवडक कवी आणि त्यांच्या कवितातून समकालीन कवितेचे चित्र पुरेसे स्पष्ट होत नसले; तरी ते काही प्रमाणात डोळ्यांसमोर उभे राहते. हे रूप सर्वसमावेशक नसले; तरी विद्यार्थ्यांना समकालीन कवितेच्या विविधतेची, तिच्या रूपाची काही एक अटकळ देणारे, दिशादर्शक व्हावे, असा प्रयत्न संपादकांनी केला आहे.

हे अभ्यासपुस्तक प्रत्यक्षात येत असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, मा. प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, मा. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, सर्व अधिकार मंडळे, मानवविज्ञान विद्याशाखेच्या मा. अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे, मा. सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई, विद्या परिषद सदस्य मा. प्रा. डॉ. सुधाकर शेलार, मराठी अभ्यास मंडळातील सर्व सन्माननीय सदस्य आणि उपसमितीतील सर्व सन्माननीय निमंत्रित तज्ज्ञ यांचे सहकार्य लाभले. या अभ्यासपुस्तकामध्ये कविता समाविष्ट करण्याची परवानगी देणाऱ्या सर्व कवींचे आणि त्यांच्या प्रकाशकांचे आभार मानतो. तसेच या अभ्यास पुस्तकाचे प्रकाशक संस्कृती प्रकाशन, पुणे यांचेही सहकार्य लाभले. त्यांचेही आम्ही आभार मानतो.

संपादक

**प्रा. डॉ. शिरीष लांडगे**

**प्रा. डॉ. भास्कर ढोके** **प्रा. डॉ. संदीप सांगळे**